**सप्टेंबर मध्ये करावयाची शेतीची कामे - (पुणे जिल्हा)**

उस -

१) लागवडीनंतर ६ ते ८ आठवड्यांनी आडसाली पिकास खताचा दुसरा हप्ता १६० किलो नत्र प्रती हेक्टर (३५० किलो युरीया प्रतीहेक्टर) द्या.

२) उभ्या पिकास आवश्यकतेप्रमाणे वेळेवर पाण्याच्या पाळ्या द्या.

३) पुर्व हंगामी ऊस लागवडीसाठी शिफारशीप्रमाणे पूर्वमशागत करून शेत लागवडीयोग्य तयार करा.

४) पुर्वहंगामी उसलागवडीसाठी उत्तम प्रतीचे नर्सरीतील बियाणे, रासायनिक खते इ.ची व्यवस्था करून ठेवा तसेच शिफारस केलेल्या जातीपैकी एका जातीची निवड करा. (को.९४०१२, को.७४०, को.७२१९, को.८६०३२, को.८०१४, को.एम.८८१२१, को.एम. २६५)

५) ठीबक सिंचन पध्दतीचा उसासाठी वापर करा.

६) लागवड पट्टापध्दतीने करा. लागवडीपुर्वी बेणे ०.३ टक्के मेलँथिऑन द्रावणात बुडवून नंतर अझोटोबँक्टर, असेटोबँक्टर, अँझोस्पीरीलम व स्फूरद जीवाणू प्रत्येकी १.२५ किलो १०० लिटर पाण्यात एकत्र मिसळून द्या. द्रावणात बूडवून लागवड करावी.

७) खोडकीड व पिठ्या ढेकूण नियंत्रणासाठी मागील महिन्यातील संदेशाप्रमाणे उपाययोजना करावी.

८) लोकरी मावा किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ टक्के ५०० मिली + मेटँसिस्टॉक १००० मिली व ५०० मिली स्टीकर अथवा १ किलो कपडे धुण्याची पावडर व वरील एक किटकनाशक ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांनी क्रायसोपर्ला अथवा कोनोबात्रा अफीडोहोरा या परोपजीवी किडीच्या २५०० अळया प्रतीहेक्टरी ऊसावर सोडाव्यात म्हणजे लोकरी मावा किडीचे जैवीक पध्दतीने नियंत्रण होईल. अथवा एन्डोसल्फान ३५ टक्के ५०० मिली + अँसिफेट ७५ टक्के पाण्यात विरघळणारी पावडर १००० ग्रँम ५०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारावे अथवा कॉन्फीडाँर मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. अथवा व्हर्टीसिलीयम लिकीयानी हे परोपजीवी जीवाणू ३ ते ४ ग्रँम प्रतीलीटर पाण्यात मिसळून फवारल्यास या किडीचे प्रभावी नियंत्रण होईल.

९) खोड किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी एकरी १० या प्रमाणात कामगंध सापळे आडसाली उसात लावावे.

भात –

१) हळव्या जातींना ५० किलो प्रतीहेक्टरी नत्राचा दुसरा हप्ता पुनर्लागणीनंतर २५-३० दिवसांनी द्या.

२) निमगरव्या व गरव्या जातींना पाण्याची सोय पाहून ४० किलो प्रती हेक्टरी नत्राचा हप्ता ३० दिवसांनी द्या.(८७ किलो युरीया प्रती हेक्टर)

३) पुनर्लागणीनंतर २५-३० दिवसांनी भात पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून कार्बेडॅझिम १० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब २५ ग्रॅम कींवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम अधिक स्टीकर १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

४) खोडकीडा, तुडतुडे इ. किडीचा प्रादुर्भाव दिसताच ४-५ ट्रायकोकार्ड प्रती हेक्टरी लावावेत अथवा एन्डोसल्फान ३५ टक्के १७ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ३२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून या कीटकनाशकाची फवारणी करावी. आवश्यकता असल्यास १५ दिवसांनी दुसरी फवारणी करावी.

५) लावणीनंतर दर १५ दिवसांनी खुरपणी किंवा कोळपणी करून तणांचे नियँत्रण करावे.

६) तणनियंत्रणासाठी थायोबेकार्ब (मॅटर्न) हे रासायनिक तणनाशक १ ते १.५ किलो प्रतीहेक्टर ४०० ते ५०० लिटर पाण्यातून लागणीनंतर १ ते २ आठवड्याने तण उगवणीनंतर फवारावे. यामुळे बिनगवतवर्गीय तणे व पाण्यातील लव्हाळा या तणांचा बंदोबस्त होतो.

खरीप ज्वारी –

१) पावसाचा ताण पडल्यास उपलब्धतेनुसार पिकाच्या संवेदनशिल वाढीच्या अवस्थेत संरक्षीत पाणी द्या.

२) खरीप ज्वारी पिकावर मीजमाशीच्या प्रादुर्भाव दिसून येताच (५० टक्के कणसे दिसून येताच) मॅलेथिऑन ५० इ.सी. १००० मिली किंवा कार्बारील ५० डब्ल्यू.डी.पी. २ कि.ग्रॅ. किंवा एन्डोसल्फान ३५ इ.सी. ७०० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी पहिली फवारणी करावी.

३) तसेच त्यानंतर ५ दिवसांनी मॅलेथिऑन ५ टक्के भुकटी कींवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी किंवा क्विनॉलफॉस (इकॅलक्स) १.५ टक्के भुकटी फोसेलॉन ४ टक्के भुकटी यापैकी १ किटकनाशक २० किलो प्रतीहेक्टरी या प्रमाणात धुरळावी.

४) कणसातील अळयांच्या नियंत्रणासाठी वर नमूद केलेल्या कोणत्याही एक किडनाशकाचा वापर अळयांचा प्रादुर्भाव दिसून येताच करावा. जरूरी भासल्यास एक आठवड्यानंतर दुसरी फवारणी करावी.

रब्बी ज्वारी –

१) वाफसा येताच हलकया जमिनित ३० x १५ cm अंतरावर मालदांडी M ३५-१ या जातीची लागवड करावी.

२) भारी जमिनित बागायती ज्वारीसाठी ४५ x २० cm अंतरावर पेरणी करावी.

३) पेरणी करीता एकरी ४ कि. बियाणे पुरेसे आहे.

४) खोड किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बोफ्युरानची प्रक्रिया करावी.

५) जिरायत ज्वारीची पेरणी उताराला आडवी करावी तसेच शेतात सपाट वाफे किंवा सरीवरंबे पाडुन घ्यावीत ज्यामुळे पडलेल्या पावसाचे पाणी जमिनित मुरविले जाईल.

खरीप बाजरी –

१) पीक संरक्षण करा

२) बाजरीचे पीक दाणे भरणेच्या अवस्थेत असताना जमिनीतील ओलावा विचारात घेऊन संरक्षीत पाणी द्या.

३) उशीरा पेरलेल्या बाजरीचे पिकावर निळे भुंगेरे, सोशे या किडीच्या प्रादुर्भाव आढळून आल्यास १.५ टक्के क्विनॉलफॉस भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी. तसेंच ज्यांना शक्य असेल त्यांनी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा.

खरीप मका –

१) पावसाचा ताण पडल्यास उपलब्धतेनुसार पिकाच्या संवेदनशिल वाढीच्या अवस्थेत पाणी द्या.

२) पिकावरील किडीचे (पाने खाणारी अळी. लष्करी इ.च्या) नियंत्रणासाठी १२५० मिली २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस किंवा ५०० मिली ५० टक्के प्रवाही मिथील पॅरेथिऑन ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारणी करावी किंवा ज्वारीच्या मिजमाशीच्या नियंत्रणासाठी वरीलप्रमाणे शिफारस केलेल्या कोणत्याही एका किटकनाशक पावडरीची धुरळणी करावी.

सुर्यफूल –

१) आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवा.

२) पाण्याच्या पाळ्या द्या संरक्षीत पाणी द्या.

३) घाटे अळी व केसाळ अळ्या पाने कुरतडून खातात व पानाच्या फक्त शिरा राहतात. कीडीचा प्रादुर्भाव दिसून येताच खालील कीटकनाशक फवारावे.

- ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मिली. किंवा क्विनॉलफॉस २५ इ.सी. १००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी फवारावे. किडीची अंडी, पुंजके, अळ्या इ. गोळा करून नाश करावा. मॅलेथिऑन ५ टक्के किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के किंवा कार्बारील १० टक्के भुकटी २५ किलो प्रतीहेक्टर या प्रमाणात धुरळावी अथवा

एस.ओ.एन.पी.व्ही. विषाणू ५०० एल.ई. ५०० लिटर पाण्यातून प्रतिहेक्टरी फवारावी.
४) करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅन्कोझेब ७५ टक्के ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे.

खरीप कडधान्य पिके –

उडीद, मूग, चवळी इ. –

१) जून महिन्यात पेरलेला उडीद, मूग व चवळी पक्व झाल्यामुळे वेळेवर शेंगाची तोडणी करावी.
२) तोडलेल्या शेंगा खळ्यावर चांगल्या वाळवून मळणी करावी.
३) मळणी करून तयार केलेले मूग, उडीद व चवळी धान्य १२ टक्के आर्द्रतेपर्यंत सुर्यप्रकाशात चांगले वाळवून कोरड्या जागी अथवा पत्र्याच्या कणगीत साठवण करावी म्हणजे साठवणीच्या काळात भुंग्यापासून संरक्षण होईल.
४) उडीद. मूग व चवळी काढलेले शेत दोन-तीन वेळा वखरणी करून रब्बी पिकासाठी तयार ठेवावे.

मटकी, हुलगा, इ.

१) मटकी हुलगा या कोरडवाहू पिकावर किडीच्या प्रादुर्भाव आढळून आल्यास ५ टक्के कार्बारील भुकटी या प्रमाणात धुरळणी करून पीक संरक्षण करावे.

भुईमूग –

१) पिक तणविरहीत ठेवा.
२) पावसाचा ताण पडल्यास पिकास फुले लागणेच्या, आरे लागणेच्या व शेंगा भरण्याच्या अवस्थेत संरक्षीत पाणी द्या.
३) भुईमुगावरील टिक्का आणि तांबेरा रोग नियंत्रणासाठी कार्बेडाझीम(०.५ टक्के किंवा मॅन्कोझेब ०.२५ टक्के) पेरणीनंतर ३० दिवसांनी २० दिवसांच्या अंतराने ३ ते ४ फवारण्या कराव्यात.
४) पाने गुडाळणारी अळी, केसाळ अळी, घाटे अळी या किडींच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क अथवा मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के १४ मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन २० इ.सी. ४ मिली. प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. किंवा क्विनॉलफॉस १.५ भुकटी किंवा मॅलेथिऑन ५ टक्के भुकटी किंवा फोझेलॉन ४ टक्के भुकटी २० किलो प्रती हेक्टरी धुरळावी.

सोयाबीन –

१) मावा, तुडतुडे, फुलकिडे, पाने खाणा-या अळ्या यांच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. अथवा SLNPV २५० एल.ई. विषाणूचे द्रावण प्रती हेक्टरी फवारावे

अथवा मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के १४ मिली किंवा फेनवेलरेट ९० टक्के ४ मिली १० लिटर पाण्यातून एक वेळा फवारावे. किंवा मिथील पॅरेथिऑन २ टक्के भुकटी किंवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी २० किलो प्रतिहेक्टरी धुरळावी.
२) पिकाच्या संवेदनाशिल अवस्थेत (फांद्या फुटण्याची, फुले येण्याची व शेंगा भरण्याची) अवस्था पावसाचा ताण पडल्यास संरक्षीत पाणी द्या.

तूर –
१) मावा, तुडतुडे, फुलकिडे, पिसारी पतंग, घाटे अळी यांच्या नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ टक्के २० मिली किंवा क्विनॉलफॉस १५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. तसेच फेरोमन सापळ्यांचा वापर करा शेंगअळीच्या नियंत्रणासाठी HaNPV चा वापर करा. फवारणी शक्य नसेल तर कार्बारील १० टक्के भुकटी, क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी किंवा पॅरेथिऑन २ टक्के भुकटी २० किलो प्रती हेक्टरी धरळावी.
२) तूरीवरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी न्युक्लीअर पॉलिहैड्रासीस व्हायरसच्या रोगग्रस्त २५० अळ्यांची पहिली फवारणी पीक फुलो-यात असताना व किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच करावी. १५ दिवसांच्या अंतराने एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून ३ फवारण्या कराव्यात.
३) तुरीचे पीक ६० दिवसांचे होईपर्यत तणमुक्त ठेवा.

रब्बी ज्वारी –
१) रब्बी ज्वारी पेरणीसाठी सुधारीत व शिफारस केलेल्या वाणांची निवड करा. हलक्या जमिनीसाठी सिलेक्शन-३ तसेच मध्यम ते भारी जमिनीसाठी एस.पी.व्ही.८६, स्वाती, सी.एस.एच.१३आर, फुले यशोदा, मालदांडी ३५-१, माऊली या वाणांचा वापर करा.
२) पेरणी १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर पर्यत संपवावी.
३) प्रतीहेक्टरी १० किलो बियाणे वापरून पेरणीपुर्वी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रती किलो याप्रमाणे बियाणे बिजप्रक्रीया करा. त्यानंतर १० किलो बियाण्यावर २५० ग्रॅम अँझोटोबॅक्टर जिवाणू खताची बीजप्रक्रीया करा.
४) पेरणीसाठी ४५ X १५ सें.मी. अंतर ठेवा.
५) बागायती पिकासाठी एकूण १०० किलो नत्र, ५० किलो स्फूरद व ५० किलो पालाश प्रतीहेक्टरी द्यावे. त्यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीचेवेळी पेरून द्यावे व उरलेले ५० किलो नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे.
६) कोरडवाहू पिकासाठी हेक्टरी २५ ते ३० किलो नत्र पेरणीचेवेळी पेरून द्यावा.
७) कोरडवाहू पिकासाठी दोन चाडी पाभरीचा वापर करावा.
८) ज्वारीवरील खोडकीडा, खोडमाशी, मावा, तुडतुडे या कीडींच्या प्रादुर्भाव दिसताच चार (४)

ट्रायकोकार्ड खोडकीडीसाठी व क्रायसोपर्ला कार्निया १० ते १५ हजार अळ्या प्रती हेक्टरी मावा नियँत्रणासाठी पिकावर सोडावेत अथवा एन्डोसल्फान ३५ टक्के १४ मिली किंवा डायमेथोएट ३० टक्के १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कीडग्रस्त रोपे काढून जाळून टाकावीत.

९) लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी अथवा मिथील पॅराथिऑन २ टक्के भुकटी २० किलोग्रॅम प्रतीहेक्टरी धुरळणी करावी.

टिप - रब्बी ज्वारीचे संकरीत व सुधारीत वाणाची छायाचित्र फाईल खाली जोडत आहोत.

करडई –

१) पेरणीसाठी सुधारीत वाणांचा वापर करा. भिमा १३० ते १३५ दिवसात तयार होते आणि उत्पन्न १४ ते १६ क्विंटल प्रतिहेक्टर येते. गिरणा १३० ते १३५ दिवसात तयार होते आणि उत्पन्न १५ ते १७ क्विंटल प्रतिहेक्टर येते (खानदेश विभागासाठी). शारदा १२२ ते १२५ दिवसात तयार होते आणि उत्पन्न १५ ते १७ क्विंटल प्रतिहेक्टर येते (मराठवाडा विभागासाठी) संरक्षीत ओलीताचा वापर करा. पेरणीसाठी (पुणे जिल्ह्यात) भीमा या सुधारीत जातीची निवड करा.

२) पुणे जिल्ह्यातील कोरडवाहू व ओलीताच्या क्षेत्रासाठी फुले कुसुमा (जे.एल.एस.एफ.४१४) बियाणे उपलब्धेतेनुसार या वाणाचाही वापर करा. ही जात १२५-१४० दिवसात तयार होते व हेक्टरी जिरायत परीस्थितीत १२ ते १५ क्विंटल व बागायत परीस्थीतीत २० ते २५ क्विंटल उत्पादन देते.

३) पेरणापुर्वी कार्बेन्डँझीम बुरशीनाशक २ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रीया करा व तदनंतर अँझोटोबँक्टर २५० ग्रॅम जीवाणूखताची प्रती १० किलो बियाण्यावर बीजप्रक्रीया करा.

४) करडईचे सलग पिक घ्या. त्यासाठी हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे वापरा.

५) संरक्षीत ओलीताचा वापर करा.

६) पेरणी सप्टेंबरच्या दुस-या पंधरवड्यात करावी. पेरणी उशीरात उशीरा १० आक्टोबरपूर्वी पूर्ण करावी.

७) पेरणी ४५ सें.मी. अंतराच्या पाभरीने करावी. बियाणे ५ ते ६ सें.मी. खोलीवर पडेल अशी काळजी घ्यावी.

८) पिकास पेरणीचे वेळी जिरायती पिकासाठी हेक्टरी ५० किलो नत्र व २५ किलो स्फुरद द्यावे. शक्यतो दोन चाड्याच्या पाभरीने खते व बियाणे एकाच वेळेस पेरून खर्च कमी करावा. बागायती पिकासाठी हेक्टरी ७५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. पैकी निम्मे व संपुर्ण स्फुरदाची मात्रा पेरणीचेवेळी द्यावी. राहीलेले निम्म्या नत्राची मात्रा ३० दिवसांनी

पहिल्या पाण्याच्यावेळी द्यावी.

९) पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करावी. दोन झाडातील अंतर १५ ते २० सें.मी. ठेवावे हेक्टरी एक लाख झाडे ठेवावीत.

भाजीपाला –

१) सर्व भाजीपाला पिकांमधील पावसामुळे साठलेले पाणी काढून जमिनीचा निचरा व्यवस्थीत करावा व पीक तणविरहीत स्वच्छ ठेवावे.

२) भाजीपाला रोपवाटीकेमधील गादीवाफ्यातील पाणी काढून टाकावे. तसेच रोपे मरू नयेत याची दक्षता घ्यावी.

३) कोबीवर्गीय भाजीपाल्यामध्ये कोबीमध्ये गोल्डन एकर, बजरंग, क्रांती, क्विस्टो आणि फुलकोबीमध्ये कुंवारी, केतकी, पावस, स्नोबॉल १६ आणि स्नोकिंग, नवलकोलमध्ये व्हाईटव्हीएन्ना आणि ब्रोकोली अशा सुधारीत आणि संकरीत जातीची निवड करा व रोपवाटीका करणेकरीता गादीवाफ्यावर बियाण्यांची पेरणी करा. बियाण्यांची पेरणी बीजप्रक्रीया (मेटॅल्क्झील ३५ डब्ल्यू.एस.सी. ६ ग्रॅम प्रती किलो) करूनच पेरणी करा.

४) वांगी, टोमॅटो, मिरची पिकामध्ये काढणी वेळेवर करावी. आणि पाण्याचा उत्तम निचरा करावा.

५) पालेभाज्यांची काढणी वेळेवर करा.

६) वाटाणा व घेवड्याची काढणी वेळेवर करा. पाण्याचा उत्तम निचरा ठेवावा.

७) रब्बी, भाजीपाला घेण्यासाठी वाफसा पाहून पूर्वमशागत करून लागवडीसाठी जमीन तयार करा.

८) वांगी, टोमॅटो, मिरची या पिकांची आंतरमशागत करून पीक स्वच्छ ठेवावे. तसेच दाण्याची आवश्यकता असल्यास पाणी नियमीत द्यावे. रोग व कीडीचा बंदोबस्त वेळेवर करावा.

९) फळभाज्यांना काठीचा आधार द्या.

१०) सर्व भाजीपाला टोमॅटो. बटाटा. वांगी. मिरची इ. पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी क्लोरोथॅलोनिल २०० ग्रॅम कींवा मॅन्कोझेब इप्रोडीओन किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५० ग्रॅम + स्टीकर १०० मि.ली. प्रती १०० लिटर पाण्यात मिसळून दर १० दिवसांच्या अंतराने फवारावे. कांदा करपा रोगाच्या खात्रीशीर नियंत्रणासाठी वरील औषधात मोनोक्रोटोफॉस १०० मिली हे किटकनाशक मिसळून फवारावे.

११) मिरची, टोमॅटो, वांगी, गवार, भेंडी, वाटाणा, घेवडा इ. पिकांवरील भुरी रोगनियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारा गंधक २० ग्रॅम किंवा ट्रायडीमेफॉन १० ग्रॅम कींवा डिनोकॅप ७ मिली अधिक स्टीकर १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी

करावी.

१२) मिरची, टोमॅटो, वांगी, या पिकांची अंतरमशागत करून पिक स्वच्छ ठेवा. तसेच पाण्याची आवश्यकता भासल्यास पाणी नियमीत द्यावे. रोग व किड यांचा बंदोबस्त करावा.

१३) रब्बी (रांगडा) कांद्याच्या एन-२-४-१, पुसारेड, अॅग्रीफाउंड लाईट रेड, आरका निकेतन, फुले सफेद, फुले सुवर्णा यामधून निवडक जातीचे रोपासाठी गादीवाफ्यावर बी. पेरा. अझाटोबॅक्टरची बिजप्रक्रीया करून बी पेरा.

१४) भोपळावर्गीय भाजीपाल्यामध्ये – घोसाळी. दुधी भोपळा. कारली. पापडी, दोडका, फळवर्गीय भाजीपाल्यात मिरची, टोमॅटो इ. – वरील केवडा रोग तसेच बटाट्यावरील करपा आणी टोमॅटोवरील फळसड रोगाच्या नियंत्रणासाठी फोसोनील ए.एस. २५ ग्रॅम किंवा बोर्डोमिश्रण ०.८ टक्के किंवा झायरम २० ग्रॅम किंवा मॅन्कोझेब २५ ग्रॅम + स्टीकर १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

फळझाडे –

१) नवीन फळझाडांची लागवड चालू ठेवावी. जास्त पावसामुळे आळ्यात साठलेले पाणी बाहेर काढावे.

२) सप्टेंबर महिन्यात अंजीराची छाटणी करावी. अंजीराच्या गत हंगामातील फांद्या त्यांच्या शेंड्याकडून १/३ ते १/२ भागावर धारदार सिकटरने छाटाव्यात. छाटावर बोर्डोपेस्ट लावावी. छाटून झाडावर राहिलेल्या फांद्याच्या मध्यभागी एक ते दोन डोळ्यांच्या पुढील बाजूस आवश्यकतेनुसार तिरका काप द्यावा. तसेंच डोळ्यावर ५०० पी.पी.एम. इथेलचा फवारा द्यावा. त्यामुळे डोळे चांगले फुटतील व भरपूर फुट खोलीच्या चर काढावा. चरात प्रत्येक झाडास ४ ते ५ घमेली शेणखत, ५०० ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद, २७५ ग्रॅम पालाश छाटणीच्या वेळी द्यावे. पाणी योग्य प्रमाणात खोडाला लागू न देता द्या.

३) डाळींबाच्या फळावरील बिबव्या रोगाच्या नियंत्रणासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन ५० ग्रॅम + १२५० ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड ५०० लिटर पाण्यातून फवारावे. दुसरी फवारणी १५ दिवसांनी करावी.

४) पेरुवरील देवी रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपीकोनॅझोल (०.१ टक्का) किंवा मॅन्कोझेब (०.२ टक्के) + कार्बेन्डॅझीम (०.१ टक्का) यांच्या फळधारणा झाल्यापासून दर १५ दिवसांच्या अंतराने ६ फवारण्या कराव्यात.

५) केळींना खताचा हप्ता द्या – लागवडीनंतर २ महिन्यांनी नत्राचा पहिला हप्ता ३५ ग्रॅम दर झाडास द्या.

६) आंबा फांदीवरील मर रोग नियंत्रणासाठी –

- वाळलेल्या फांद्या थोड्या निरोगी भागासहित कापून घ्याव्यात व त्यावर बोर्डोपेस्ट लावावी.
- खोडावरील वाळलेली साल काढावी व त्यावर बोर्डोमिश्रण पेस्ट (१० टक्के) अधिक कार्बारील ५० टक्के (३० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी) यांचे एकत्रीत मिश्रण चोळावे.

फुलपिके –
१) गुलाब, शेवंती, जरबेरा यांचे रोग व किडीपासून संरक्षण करा.
२) झेंडू, अँस्टर, यांची रब्बी लागवड वेळेवर करा.
३) ग्लँडीओलस लागवडीसाठी जमीन तयार करा.
४) सर्व फुलपिकांना वेळेवर पाण्याच्या पाळ्या देऊन शेत तणविरहीत ठेवा.

शेवंती –
१) पानावरील तपकीरी ठिपके व करपा याकरीता ०.२ टक्के क्लोरोथँलोनिल अथवा कॉपर ऑक्झीक्लोराईड किंवा ०.२ टक्के मँन्कोझेब या बुरशीनाशकाची दर १० दिवसांनी फवारणी करावी.
गुलाब –
१) डायबँक या रोगाच्या संरक्षणाकरीता ०.२ टक्के कँप्टन किंवा ०.२ टक्के मँन्कोझेब किंवा ०.२ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराईड या बुरशीनाशकाच्या छाटणी केल्याबरोबर व त्यानंतर दर १० दिवसांनी दोन फवारण्या कराव्यात.
गुलछडी –
मुळकुज्या व खोडकुजव्या स्क्लेरोशियम विल्ट या रोगाच्या नियंत्रणासाठी प्रथम पाण्याच्या योग्य निचरा करून घेण्यात यावा त्यानंतर ०.२ टक्के कँप्टन किंवा ०.२ टक्के बेनोमिल किंवा ०.३ टक्के थायरम या बुरशीनाशकाची महिन्यातून एक ड्रेंचिंग व फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांनी ट्रायकोडर्मा जिवाणू २.५ किलो प्रती हेक्टरी जमिनीत मिसळून द्यावे.

पशुसंवर्धन –
चारा पिके
१) मका, ज्वारी इ. चारा पिकांना नत्राचा दुसरा हप्ता हेक्टरी २५ कि.ग्रँ. द्यावा.
२) अतिरीक्त हिरव्या चा-यापासून मुरघास बनवावा.

जनावरांचे या कालावधीत आढळणारे विविध आजार व त्यावरील उपाय
१) या कालावधीत जनावरांना विविध आजार होत असल्यामुळे जनावरांचे गोठे वेळोवेळी

धुवावेत व स्वछच ठेवावेत, भरपूर उजेड व हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.
२) रोगी जनावर अलग ठेवावे. रोगी जनावरांचे मलमुत्र दूर नेऊन पुरून टाकावे.
३) जनावरांना लाळ – खुरकत या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात प्रतिबंधक लस टोचावी.
४) गोचीड – माशा वगैरेमुळे विविध रोगांचा प्रसार होत असल्यामुळे, गोठे स्वच्छ ठेवावेत व जनावरांचा अंगावर गाचीड प्रतीबंधक पावडर लावावी. जनावर व गोठ्यामध्ये डेल्टामेथ्रीन १२.५० टक्के, सायपरमेथ्रीन १०० इ.सी. इ. चा-याव्यतीरीक्त जागेवर काळजीपुर्वक फवारावीत.
५) या कालावधीत कोंबड्यांना कॉलरा, पांढरी हगवण यासारखे रोग होतात. त्यासाठी सलमेट, नेफटीन सारखी औषधे खाद्यातून व पाण्यातून द्यावीत.
६) म्हशींना तसेंच सर्व जनावरांना पिण्यास नेहमी स्वच्छ पाणी द्यावे.
७) जनावरांना हिरवा चारा जास्त प्रमाणात देऊ नये, त्यामुळे जनावरास पोटफुगीचा त्रास होणेची शक्यता असते. जनावरांना योग्य प्रमाणात ऊर्जा मिळणेसाठी कोरडा चारा व खुराक योग्य प्रमाणात द्या.

**कृषि विज्ञान केंद्र**
**बारामती**

---------------------------------------------------------------------------------------------------

**Recommended field operations to be carried out in the month of September (Pune District)**

Sugarcane –
1) Provide the adsali sugarcane with 160kg / ha. Nitrogen as a second dose (350 kg urea/ ha) at 6-8 weeks after planting.
2) Provide the sugarcane crop with irrigations as per the need of the crop.
3) As per the recommendations complete the preparatory tillage operations and keep field ready for plantation of preseasonal Sugarcane.
4) To plant the preseasonal sugarcane be ready with good quality seedsets from nursery, fertilizers etc. select a variety which is recommended for cultivation. (CO-94012, CO-740, CO-7219, CO-86032, CO-8014, COM-88121)
5) Use drip irrigation method for sugarcane plantation.
6) Do planting with paired row method of planting. Before planting dip sugarcane sets which are needed for plantation of one hectare

sugarcane in the solution of 0.1 % bavistin for 10 minutes. To control the mealy bugs add diamethoate 30% 265ml or phosphomidon 85% 80ml or malathion 50% 300 ml in above solution of 100 liters. Start planting of adsali sugarcane after dipping the sets in the solution of azotobacter, acetobacter, azospirillum, and PSB bacterial culture @ 1.25 kg mixed in 100 liters of water.
7) To control the stem borer and mealy bugs carry out the control measures provided in the last month calendar of recommendations.
8) To achieve good control on wooly aphids spray the crop with endosulphan 35% 500ml + metasystox 1000 ml and 500ml sticker or 1kg soap powder and any of the above insecticide mixed in 500 liters of water. Fifteen days after this spray release 2500 larvae of crysoperla or conobathra aphidivora Paracitic insects on sugarcane crop to control wooly aphids in biological way. Or spray endosulphan 35% 500ml + acephate 75% water soluble powder 1000 gm per hectare mixed in 500 litres of water. Or Confidor 2ml mixed in 10 litres of water or verticilium lecane 30-40 gms mixed in 10 liters of water.

Paddy –
1) spray the paddy crop of 25-30 days after transplanting with carbendazim 10gm or mancozeb 25gm or copper oxychloride 25gm + 10ml sticker mixed in 10 liters of water as preventive measure against blight disease.
2) Stick 4-5 Trichocards / ha. Immediately after incidence of stem borer, jassids etc. or spray endosulphan 35% 17ml or quinolphos 25% 32ml mixed in 10 liters of water. If necessary carryout second spraying 15 days after transplanting.
3) Control the weeds by performing hoeing/ weeding at the interval of 15 days after transplanting.
4) To control the weeds spray weedicide thiobencarb (satern) 1-1.5 kg/ ha. Mixed in 400-500 liters of water at 1.2 weeks after transplanting and after emergence of weeds. This controls the lavala and non grass family weeds.

Kharif Jawar –
1) If rain ceases for more period of tie then provide the crop with protective irrigations at critical prowth stages of crop considering to the availability of water.
2) If the attack of sorghum midge seems on crop (50% formation of cobs) then spray the crop with 50% malathion 1000 ml or carbaryl 50 WDP 2 kg or endosulphan 35EC 700ml mixed in 500 liters of water.
3) Five days after this spraying dust the crop with any of the following insecticide @ 20kg / ha.malathion 5% powder / endosulphan 4% powder / quinolphos 1.5% powder / foselon 4 % powder

4) If necessary carryout second spraying one week after first spraying.

Kharif Bajra –
1) Protect your crop.
2) Considering soil moisture status provide the crop with protective irrigation at the time of grain filling stage.
3) If the incidence of blue beetle, sucking pests appears on late sown bajra then dust the crop with 1.5 quinolphos powder @ 20kg / ha. Use light traps for those it is possible.

Kharif Maize –
1) If rain ceases for more period of time then provide the crop with protective irrigations considering the availability of water of critical growth stages of crop.
2) To control insect pests on maize spray 1050ml 20% chloropyriphos or 500liters of water.

Sunflower –
1) Carryout intercultivation and keep corped area weed free
2) Provide protective irrigations.
3) Hairy caterpillars feed of green leaves leaving only reins on leaves. Spray any of the following insecticide after incidence of pests.
5% neem extract of 35% endosulphan 1000 ml or 25EC 1000ml / ha. mixed in 500 liters of water. Collect and destroy the eggs, egg masses, larvae of pests. Dust the crop with malathion 5% or quinolphos 1.5% or carbaryl 10% powder @ 20kg / ha or spray S.O.N.P.V. 500 LE mixed in 500 liters of water.
4) Spray the crop with Mancozeb 75% 25gm mixed in 10 liters of water to control blight.

Kharif Pulses –
Blackgram, greengram, Copea. etc.
- Carryout harvesting of matured pods of green gram blackgram and cowpea sown in the month June.
- Carryout threshing of well dried pods. Manually.
- Dry this threshed produce of green gram, blackgram, cowpea crop in sunlight bringing down the moisture % up to 12% store this threshed produce in irondrum to protect if from beetles during storage.
- Carryout 2.3 harrowing in greengram, blackgram and udid harvested field and keep it ready for rabi.

Groundnut –
1) Keep your crop weedfree.
2) Provide the crop with protective irrigations at flowering peg

formation and good filling stages of crop if rainfall stress occurs.
3) Carryout 3-4 spraying of carbendazim (0.5% for mancozeb (0.25%) with a gap of 20 days. From 30 days after sowing to control the tikka and rust disease.
4) spray the crop with 5% neem extract or 36 % monocrotophos 14ml or cypermethrin 20EC 4ml mixed in 10 litres of water to control the leaf soller, hairy caterpillar, and pod borer,
Or –
- Dust the crop with 1.5% quinolphos powder or 5% malathion powder or phoselon 4% @ 20kg per ha.

Soyabean –
1) To control the aphids, jassids, thrips, leaf eating caterpillar spray the crop with 5% neem extract or 250 LE S.L.N.P.V. solution for one ha. Area or monocrotophos 36% 14ml or fernvalate 20% 4ml mixed in 10 liters of water of dust methyl parathion 2% powder or 4% endosulphan powder @ 20kg / ha.
2) If rainfall stress is there then provide the crop with protective irrigation at critical growth stages of crop.

Redgram –
1) Spray the crop with endosulphan 35% 20ml or quinolphos 15ml mixed in 10 liters of water to control aphids jassids, thrips, pod borer etc. make use of pheromone traps. Use H.A.N.P.V for control of pod borer. If spraying is not possible then dust the crop with 10 % carbaryl powder @ 20 kg / ha.
2) To control the pod borer of Tur carryout first spraying of 250 H.N.P.V. infected larvae at the time of flowering and immediately after incidence of pest. Carryout 3 sprayings of endosulphan 1000ml mixed in 500liters of water with a gap of 15 days.
3) Keep redgram crop weedfree up to attaining 10 days.

Rabi Jawar –
1) Choose improved and recommended varieties of rabi jawar for sowing.
Light soil – selection 3
Medium to heavy soil – SPV-86, Swati, CSH-13 R, Phule Yashoda, Maldandi -35-1, Mauli.
2) Complete the sowing by the 15 sept – 15 oct.
3) Use 10 kg seed for sowing 1 ha area. Before sowing treat the seed with 300 mesh sulphur @ 4gm / kg of seed after this treatment, treat the seed with 250 gm azotobacter bacterial culture for 10kg of seed.
4) Keep spacing of 45 X 15 for sowing.
5) Provide the irrigated crop with100 kg N, 50kg P and 50 kg K per

hectare area. Out of that 50kg N and total P and K should be drilled at the time of sowing and remaining 50kg N be given 25-30 days after sowing.
6) For dryland crop 25-30 kg of Nitrogen should be drilled along with seed at the time of sowing.
7) Use double bowl seed drill for dryland crop.
8)Use 4 Trichocards to control stem borer and release 10-15 thousand larvae of crysoperla carnae on crop to control Aphids or spray the crop with endosulphan 35% 14ml or dimethoate 50% 10ml mixed in to liters of water plants affected with pests should be roughed and burned.
9) To control armyworm spray the crop with 5% neem extract or dust the crop with 2% methyl parathion powder @ 20 kg / ha.

Safflower –
1) Use improved varieties for sowing. Bhima becomes ready for harvesting within 130-135 days and yields 14-16 quintal / hectare. Girna becomes ready in 130-135 days and yield 15-17 quintle / ha (Recommended for Khandesh) Sharda completes life cycle in 122-125 days and yields 15-17 Quintal per hectare (for Marathwada region). provide protective irrigations to the crop.
2) Use Phule Kusuma (JLSF-414) variety for dry land and irrigated area of Pune district. This variety becomes ready within 125-140 days and yields 12-15 quintal per hectare in dry land and 20-25 quintal / hectare in irrigated conditions.
3) Treat the seed with carbendazim @ 2gm / kg before sowing.After chemical treatment carryout treatment of azotobacter @ 250gm for 10 kg of seed.
4) Take safflower as a sole crop. Use 10-12 kg of seed for one hectare area.
5) Complete the sowing by the second fortnight of September. Complete sowing by the 10th October under late sown conditions.
6) Carryout sowing with 45cm seed drill. Care is taken that the seed should be placed at 5-6 cm deep.
7) For rain fed crop provide 50kg N and 25kg P/ hectare at the time of sowing sow the fertilizers and seeds at a time by the use of double bowled seed drill for irrigated crop provide 75 kg N and 50 kg P per hectare out of that 50% N and total P should be given at the time of sowing. Remaining N should be provided at 30 days after sowing during first irrigation.
8) Carryout thinning 15 days after sowing. Keep 15-20 cm distance between two plants. Maintain 1 lack population for one hectare area.

Vegetables –

1) Drain out the excess water stagnated due to heavy rains and keep the plot free of weeds.

2) In vegetable nursery, drain out excess water from raised beds and protect the seedlings from wilting.

3) In case of cruciferous crops, select only improved and hybrid varieties for cultivation e.g. Golden acre, Bajrang, Kranti and quisto etc in cabbage, Kuwari, Ketki, Pawas, snow ball-6 and snow king etc in cauliflower and white Vienna for knol-khol. Grow the nursery on raised beds and treat the seed with 35 WSC metalaxyl @ 6kg/ Kg before sowing.

4) Harvest the vegetable like Brinjal, Tomato, chilli and leafy vegetable at proper stages of harvesting.

5) Harvest the pod vegetables like peas and beans at right stage for good market.

6) Prepare the field for Rabi Vegetable cultivation at Vapsa Condition.

7) Keep the plots of Brinjal, Tomato and chilli, weed free by applying required intercultivation and irrigate the plots as per requiredment. Keep the crop away from diseases and pest by applying plant protection measures regurlarly.

8) Steaking should be done in fruit vegetables e.g. Tomato.

9) To protect the vegetables e.g. Tomato, Potato, Brinjal, Chilli etc. from blight disease, spray the crop with chlorothalonyl 200gm. Or Mancozeb or Copper Oxychloride 20gm + sticker 100ml / lit of water at an interval of 10 days. For onion crop the same spray should be used adding 100 ml Monocrotophos in it.

10) To protect the crops from powdery mildew use 20 g. wettable sulphur or 10 g. Tridemephon or Tridemorph or 7ml Dinocap + 10ml Sticker / in 10 liters of water.

11) Use the varieties like N-2-4-1, Pusa Red, Agrifound hight Red Arka liketan, Phule safed and phule suvarna for sowing of rabi onion nursery. Treat the seed with Azotobacter @ 250gm / 10 kg.

12) To control the downy mildew disease on cucurbits of blight on potato or fruit rot of Tomato spray the crops with 25gm. Phosonyl or 0.8 % Bordo mixture or 20g. Zirum or 25g. Mancozeb + 10ml sticker in 10 lit. of water.

Fruits –

1) Drain out the excess water from the basins of fruit trees.

2) September is right time for pruning of fig trees. Cut out the last season branches 1/3 to 1/2 the tip with sharp secator. Apply Bordo paste on the cuts after cutting. Notch the branches by giving slanting cut above 1 to 2 healthy buds and spray the buds with 500 P.P.M. ethrel for early and profuse sprouting. Dug the round trench of 6 inches wide and 1 feet deep under the spread of tree and apply 25-30 kg F.Y.M. 500g N. 250g P. and 275g K at the time of pruning. Give sufficient quantity of water in such a way that it does not touch to the stem of tree.

3) For the fruit spot disease of pomegranate spray the crop with streptocycline 50g + 1250g copper oxychloride in 500lit of water. Follow the second Spray after 15 days.

4) Protect the guava crop from canker by spraying with Mancozeb (0.2%) + Carbendazym (0.1%) at an interval of 15 days. Apply 6 spray after fruit sets, at 15 day interval.

Mango –
- Cut out the wilted branches along with some healthy part and apply bordo paste on the cut wounds.
- Remove the dried bark from the stem and apply Bordo paste (10%) + Carbaryl 50% (30gm / 10 liter water) on that part.

Flower –
1) Protect the crops like Rose, chrysanthemum, Gerbera etc. from diseases and pests.
2) Do the Rabi season cultivation of Merigold and Aster Properly.
3) Prepare the field for Gladiolus Cultivation.

Crysanthemum –
1) Spray the crop with 0.2% chlorothalonil or Copper Oxychloride or 0.2% Mancozeb Fungicide at an interval of 10 days for protection against leaf spot and blight diseases.

Rose –
1) To protect the crop from dieback disese spray with 0.2 % captan or 0.2% Mancozeb or 0.2% Copper Oxychloride Immediately after pruning and there after two such sprays at 10 days interval.
2) for leaf spot disease spray any of the fungicide mentioned above at 10 days interval.

3) Tuberose – To protect the crop root-rot and stem rot first drain out the water from the field properly. Do the drenching and spraying of the crop with 0.2% captan or 0.2% Benomeal or 0.3% Thiram, once in each month. Apply trichoderma @ 2.5kg/ ha after 15 days of drenching.

Animal Husbandry –

1) Provide the second dose of N @ 25kg / hectare to the forage crops like maize, Jawar etc.
2) Prepare silage from the excess green fodder.
3) As this period of time (Sept) is very sensitive for attack of different diseases so timely wash animals shed and keep it clean. Care is taken that plenty of light and ventilation should be maintained in shed.
4) Keep diseased animal separate. Excreta of such animals should be buried in soil.
5) Execute vaccination in first fortnight of September as a preventive measure against foot and mouth disease.
6) Flies, ticks are responsible for spread of different diseases. So keep animals shed clean and apply fly repellant powder on body as preventive measure against ticks & flies. Carefully carry out spraying of deltamethrin 12.5 % cypermethrin 100EC on animals and inside the room.
7) In this period poultry birds are use to be affected by fowl typhoid, bacillary white diarrhea diseases. Provide the medicines like Salmet, Neftin through water and feed.
8) Give clean water to all the animals.
9) Do not provide green fodder in excess quantity which leads to the stomach pain. Provide balanced ration and dry fodder to the animals to get energy in good proportion.

**Krishi Vigyan Kendra,**
**Baramati.**
**Dist Pune.**